**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,**
**१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com

**अत्यंत महत्त्वाचे** जा.क्र.शिउसं/उमाशि-२/संच मान्यता २०१५-१६/२०१६/ ६४६०
**ई-मेल** दिनांक :- ~~१०.०५.२०१६~~ 3 JUN 2016

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**विषय :- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने करणेबाबत**

**संदर्भ :-१.मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे-१ यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४१/संचमान्यता/२०१६/२६८३ दि. २६.०४.२०१६.**
**२. या कार्यालयाचे पत्र दिनांक २८.०४.२०१६**
**३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांनी दि.१०.०५.२०१६ रोजी व्ही.सी. मध्ये दिलेल्या सुचनानुसार**
**४. या कार्यालयाचे पत्र** जा.क्र.शिउसं/उमाशि-२/संच मान्यता २०१५-१६/२०१६ **दि.१०.०५.२०१६.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने दि.०४.०५.२०१६ ते १४.०५.२०१६ या कालावधीत करण्यात आलेली होती. तथापि अद्याप काही उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयानी संच मान्यता करुन घेतलेली नाही. त्यामुळे वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करता येत नाही.

ज्या अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांनी अद्याप पटपडताळणी व संच मान्यता करुन घेतलेली नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांचे मे-२०१६ पेड इन जुन-२०१६ चे वेतन देयक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयाकडुन स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ज्या कायम विना अनुदानित/स्वंयअर्थ सहाय्यित कनिष्ठ महाविद्यालये पटपडताळणी/संच मान्यता करुन घेणार नाहीत अशा कनिष्ठ महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची पटपडताळणी व संच मान्यता शै.वर्ष २०१५-१६ च्या संच मान्यतेशिवाय करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यावाहीसाठी
शिक्षणाधिकारी (माध्य), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक
पुणे/अहमदनगर/सोलापूर

यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ची संच मान्यतेची प्रत वेतन देयकासोबत जोडलेली असल्यास मे-२०१६ पेड इन जुन-२०१६ चे वेतन देयक स्विकारण्यात यावेत. अन्यथा शै.वर्ष २०१५-१६ ची संच मान्यता प्रत सोबत जोडलेली नसल्यास वेतन देयक स्विकारु नये.